पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - 17

ड प्रभाग समिती,

**कार्यपत्रिका क्र.9**

**सभावृत्तांत**

दिनांक 8/2/2013 वेळ सकाळी 11.00 वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि. 8/2/2013 रोजी सकाळी 11.00 वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.निता पाडाळे, | अध्यक्षा, |
| 2. | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| 3. | मा.कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| 4. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| 5. | मा.निलेश बारणे | सदस्य |
| 6. | मा.श्रीरंग बारणे | सदस्य |
| 7. | मा.विलास नादगुडे | सदस्य |
| 8. | मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे | सदस्य |
| 9. | मा.रामदास बोकड | सदस्य |
| 10. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| 11. | मा.नवनाथ जगताप | सदस्य |
| 12. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य |
| 13. | मा.विमल काळे | सदस्या |
| 14. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| 15. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| 16. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| 17. | मा.माया बारणे | सदस्या |
| 18. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| 19. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| 20. | मा.शितल काटे | सदस्या |
| 21. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| 22. | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| 23. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| 24. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |
| 25. | मा.सोनाली जम | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रशासन अधिकारी सभा शाखा, मा.दांगट, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.के.जी.थोरात, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.रामनाथ टकले, उपअभियंता, स्थापत्य, मा.जीवन गायकवाड, उपअभियंता स्थापत्य, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता , विदयुत मा.अजय सुर्यवशी, उपअभियंता , पाणीपुरवठा विभाग , मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.अनिल राऊत , उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.रत्नपारखी , उपअभियंता, स्थापत्य उदयान मा. एस.डी.लगस, सहा.आरोग्याधिकारी, मा.व्ही.एल.चव्हाण सहा.आरांग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे पुढीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक 1. -** बी.आर.टी.एस.कस्पटेवस्ती ते वाकड फलायओव्हर या 45 मी.डी.पी.रस्त्याने बाधित होणारा महापालिका शाळेचा भाग पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.कार्यकारी अभियंता यांचा प्रस्ताव.

**विषय क्रमांक 2 -** दीपमाला चौकाला धर्मवीर संभाजी महाराजांचे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शितल नाना काटे यांचा प्रस्ताव.

**विषय क्रमांक 3 -** प्रभाग क्रमांक 54 पिंपळेनिलख विशालनगर येथील पदपथास नामकरण करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आरतीताई चोंधे यांचा प्रस्ताव.

**विषय क्रमांक 4 -** सांगवी येथे मनपाच्या वतीने उभारण्यात आलेल्या गावठाण येथील तलाठी कार्यालय कार्यरत असलेल्या इमारतीस स्वर्गीय बाबुराव खंडूजी ढोरे इमारत असे नामकरण करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक 68 — विषय क्र.1

दिनांक 8/2/2013 — विभाग - स्थापत्य बीआरटीएस

सुचक - मा. स्वाती कलाटे — अनुमोदक - मा.आरती चोंधे

संदर्भ :- क्र.स्था/बीआरटीएस/229/2013, दिनांक 5/2/2013 रोजीचा मा.कार्यकारी अभियंता, बीआरटीएस विभाग यांचा प्रस्ताव

बी.आर.टी.एस.कस्पटेवस्ती ते वाकड फलायओव्हर या 45 मी.डी.पी.रस्त्याचे काम जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत सुरु आहे. या 45 मी.रस्त्याने मनपाची वाकड येथील प्राथमिक शाळा (शाळा क्रमांक 57) बाधित होत आहे.

सदर शाळेचा बाधित होणारा भाग पाडलेशिवाय रस्त्याचे काम पुर्ण करता येत नाही. पाडण्यात येणा-या भागातील वर्गखोल्या वाकड येथील मनपा दवाखान्याची इमारतीत स्थलांतरीत करणेस मा.शिक्षण अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच विषयांकित प्रस्तावास मा.आयुक्त यांनी संदर्भिय प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदर शाळेचा बी.आर.टी.एस.रस्त्याने बाधित होणारा भाग पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 69 — विषय क्र.2

दिनांक 8/2/2013 — विभाग - स्थापत्य

सुचक - मा. शितल काटे — अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.शितल काटे यांचा दिनांक 8/2/2013 रोजीचा प्रस्ताव.

जगताप डेअरी रोड पिंपळेसौदागर येथे दीपमाला सोसायटी जवळ चौकाला धर्मवीर संभाजी महाराज चौक असे नांव देण्यात यावे कारण या चौकापासून जवळच धर्मवीर संभाजी महाराज यांचे नावाने महापालिकेचे उदयान आहे त्यामुळे या चौकाला धर्मवीर संभाजी महाराज चौक नांव देणे योग्य होईल . सबब सदर चौकास धर्मवीर संभाजी महाराज चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाची अंमलबजावणी करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 70 विषय क्र.3
दिनांक 8/2/2013 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. आरती चोंधे े अनुमोदक - मा. शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.आरतीताई चोधे यांचा दिनाक 8/2/2013 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 54 पिंपळेनिलख विशालनगर येथील पदपथास 1. कै.मुरलीधर बाबुराव कामठे पथ, स.नं.43/2, पिंपळेनिलख, 2. कै.ज्ञानोबा बाबुराव कामठे पथ, स.नं.43/2, 3. कै.बेबीताई निवृत्ती इंगवले पथ स.नं.7, पिंपळेनिलख 4. कै.पार्वतीबाई सोमाजीराव दळवी पथ स.नं.28/1/10, बोरा प्लॅनेटसमोर 3. कै.तुकाराम गणपत बालवडकर पथ स.नं.25 बालवडकर विहार विशालनगर.अशी नांवे देणेकामीच्या प्रस्तावास मानयता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 71 विषय क्र.4
दिनांक 8/2/2013 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. प्रशांत शितोळे अनुमोदक - मा. बापू काटे

संदर्भ :- मा. प्रशांत शितोळे यांचा दिनाक 8/2/2013 रोजीचा प्रस्ताव.

सांगवी येथे मनपाच्या वतीने उभारण्यात आलेल्या गावठाण येथील तलाठी कार्यालय कार्यरत असलेल्या इमारतीस स्वर्गीय बाबुराव खंडूजी ढोरे इमारत असे नामकरण व्हावे. सदर जागेचे जागामालक ढोरे कुटूंबीय असलेने व या परिसरातील कार्य पहाता त्यांचे नांव या इमारतीस देणेत यावे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-

निता विलास पाडाळे
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ 17

सही/-

प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

जा.क्र.ड/सभा/कावि/ 53/2013
दिनांक 29/ 4 /2013
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका